


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५३ ■ सोमवार, दि. २३ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# काँग्रेसचा अशोक खरात प्रकरणावर स्थगन प्रस्ताव

## एच आय व्ही टेस्ट करून घ्या - विजय वडेट्टीवार

प्रतिनिधी २३ मार्च

**मुंबई:** विधानपरिषदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत झालेल्या गोंधळावर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी सातारा जिल्ह्याच्या पोलिस आधीक्षकांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली. तसेच पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सवाल उपस्थित केला की आम्ही सुरक्षित आहोत की नाही ? सभागृहात शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी सातारा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांच्या निलंबनाची मागणी लावून धरल्यानंतर सभापती नीलम गोऱ्हे यांनी निलंबनाचे निर्देश दिले आहेत. तसेच शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर एसपींच्या निलंबनाच्या मागणीसाठी निदर्शने देखील केली.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधकांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. अशोक खरातच्या संदर्भात जो विषय घडलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. या व्यक्तीने आपल्या तथाकथित शक्तींचा दुरुपयोग करून अनेक महिलांसोबत दुष्कृत्य केले आहे. या संदर्भातील कारवाई आपल्या पोलिसांनी केली आहे. याचा ट्रॅप तयार करून केली आहे. यात महिला देखील असल्याने त्या समोर यायला तयार नव्हत्या. त्यांची फसवणूक झाली आहे. त्यांना धीर दिल्यानंतर महिला तक्रारी करत आहेत. कारवाई जारी आत्ता झाली असली तरी तयारी आधीपासून सुरू होती.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण नोटीस काढून ठेवली होती, त्याला बाहेर पळून जाता येणार नाही, अशी व्यवस्था करून ठेवली होती. हा महिलांच्या स्वाभिमानाचा प्रश्न आहे.

### अशोक खरातसोबत ज्यांचे फोटो आहेत त्यांनी राजीनामा द्यावा- नाना पटोले

सभागृहात बोलताना कॉंग्रेस नेते नाना पटोले म्हणाले, अशोक खरातसोबत ज्यांचे ज्यांचे फोटो आले आहेत त्यांनी राजीनामा द्यावा. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा दिला आहे. इतरांचे देखील राजीनामे घेतले पाहिजे. विजय वडेट्टीवार म्हणाले, महाराष्ट्र कुठे चालला आहे? नाशिकचा जो कोणी भोंदू महाराज आहे. त्याला जे कोणी भेटले असतील त्या सगळ्यांची HIV टेस्ट करून घ्यावी लागेल. नाहीतर सगळेच मारतील. या अशोक खरातचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत. यात राजकीय क्षेत्रातील लोक, काही अधिकारी लोक आहेत त्याच सोबत यात काही महसूल विभागाचे अधिकारी आहेत. या सर्व जे जे भेटले आहेत त्या सगळ्यांचे सीडीआर तपासले पाहिजे.

# शेअर बाजारात व्यवहार सुरू होताच 11 लाख कोटी स्वाहा!



वृत्तसंस्था २३ मार्च

**नवी दिल्ली :** सोमवारी, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे आशियाई बाजारांमध्ये विक्रीच्या दबावाचा परिणाम देशांतर्गत शेअर बाजारावरही दिसून येत आहे. दिवसाच्या सुरुवातीला सेन्सेक्स १८०० हून अधिक अंकांनी जमिनीवर आला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टीदेखील ५५० हून अधिक अंकांनी खाली घसरला आहे.

गेल्या आठवड्याला देशांतर्गत बाजार ग्रीन झोनमध्ये क्लोज झालेले पण सोमवारी सकाळी सुरुवातीला देशांतर्गत बाजाराने आघाडी गमावली. देशांतर्गत बाजारातील सकाळच्या ट्रेडिंगमध्ये सर्व क्षेत्रीय निर्देशांक घसरणीसह व्यवहार करत असून निफ्टी ऑटो, मीडिया, बँक, मेटल आणि पीएसयू बँक निर्देशांक सुमारे २ज्ञ् घसरले. हिंदाल्को, टाटा स्टील, स्टेट बँक ऑफ इंडिया, महिंद्रा अँड महिंद्रा आणि एचडीएफसी बँकेला सर्वाधिक फटका बसला. या घसरणीमुळे, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे ११ लाख कोटी रुपयांनी कमी होऊन ४१८ लाख कोटी रुपयांवर आले.

### रुपया नवीन नीचांकी पातळीवर

या दरम्यान, भारतीय चलन पुन्हा नव्या नीचांकी पातळीवर कोसळले. सुरुवातीच्या व्यवहारात रुपया डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या नीचांकी पातळी, ०.१ टक्के घसरून ९३.८३, वर आला. गेल्या आठवड्यात आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया मागील सत्रात ६४ पैशांनी घसरून प्रति डॉलर ९३.५३ वर बंद झाला होता. पण, वाढत्या जागतिक तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ या पार्श्वभूमीवर परकीय भांडवलाचा सतत होणारा बहिर्वाह यामुळे रुपयावर दबाव आहे.

### आशियाई बाजारांमध्ये मोठी घसरण

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'इराणने ४८ तासांच्या आत होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली नाही, तर तेथील वीज प्रकल्प नष्ट केले जातील', अशी धमकी दिली तर इराणने देखील प्रत्युत्तर देण्याचा आपला इरादा स्पष्ट केला. अशा परिस्थितीत, २३ मार्च रोजी आशियाई बाजारांमध्ये मोठी घसरण झाली. दक्षिण कोरियाचा शेअर बाजार उघडताच जवळपास सहा टक्क्यांनी घसरला. जपानचा शेअर बाजारही चार टक्क्यांहून अधिक आपटला.




नागपूर येथे वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना पत्र लिहून काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी आणि आम आदमी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## वेळ निघुन गेल्यावर उमेदवारी अर्ज मागे घेणे गैरकायदेशीर

प्रतिनिधी २३ मार्च

**अकोला:** जिल्हा बँकेच्या निवडणूक प्रक्रियेतील अर्ज मागे घेण्याच्या कथित गैरप्रकाराची वरिष्ठ स्तरावरुन चौकशी सुरु झाल्याची माहिती प्राप्त झाली. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आणि निर्धारीत वेळ निघून गेल्यावर दबावातून एका उमेदवाराचा अर्ज मागे घेतला गेला. ही बाब लोकशाहीला घातक असून संबंधित अधिकाऱ्याविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. वेळ निघुन गेल्यावर अर्ज मागे घेणे, हे एक प्रकारे प्रतिस्पर्धी उमेदवाराला बिनविरोध निवडीसाठी मदत करण्याचे कृत्य जिल्हा उपनिबंधक कार्यालयात झाले आहे. या विषयीची सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडीओ सहकार खात्यात आहे. तो तत्काळ जप्त करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

## ज्येष्ठ नेते, राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे निधन

प्रतिनिधी २३ मार्च



**नागपूर :** विदर्भातील ज्येष्ठ राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक तथा राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे रविवार, २२ मार्च रोजी नागपूर येथे निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने विदर्भासह राज्याच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मेघे यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३६ रोजी वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे झाला होता. त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच भाजपमध्ये काम करत चार वेळा लोकसभा खासदार म्हणून नागपूर, रामटेक व वर्धा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केले. याशिवाय राज्यसभा सदस्य तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेतही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती. राजकारणासोबतच त्यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केले. 'नागर युवक शिक्षण संस्था'च्या माध्यमातून तसेच 'दत्ता मेघे इन्स्टीट्यूट ऑफ मेडीकल सायन्स'सारख्या संस्थांच्या उभारणीतून त्यांनी ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्य सुविधा पोहोचवल्या. त्यांच्या कार्यामुळे विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांना संधी मिळाली. मेघे हे विदर्भ राज्याच्या मागणीचे समर्थक म्हणूनही ओळखले जात होते.

## खाडी देशांचे उत्पादन ७० टक्क्यांनी घटले!

**कुवैत :** इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील युद्धामुळे 'होरमुझची सामुद्रधुनी' धोक्यात आली असून, याचा मोठा फटका जागतिक तेल अर्थव्यवस्थेला बसला आहे. इराणच्या कडक नाकेबंदीमुळे सौदी अरब, इराक आणि कुवैत यांसारख्या प्रमुख खाडी देशांचे तेल उत्पादन ७० टक्क्यांपर्यंत कोसळले आहे. या संकटामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत ३.२६ टक्के वाढ होऊन ब्रेंट क्रूड ११२.१९ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहे, जो गेल्या दोन वर्षांतील सर्वोच्च स्तर आहे.

सौदी अरब या जगातील सर्वात मोठ्या तेल निर्यातदाराचे उत्पादन १ कोटी बॅरलवरून ८० लाख बॅरलवर आले आहे. साठवणुकीची सोय संपल्याने अरामकोला अनेक तेल विहिरी तात्पुरत्या बंद कराव्या लागल्या आहेत. इराक येथील उत्पादनात तब्बल ७० टक्के घट झाली आहे. परदेशी कंपन्यांनी आपले कर्मचारी परत बोलावल्याने उत्पादन ४३ लाखांवरून १३ लाख बॅरल प्रतिदिन झाले आहे.

## दोन पैकी एका चोरट्यास नागरिकांनी रंगेहात पकडून दिला चोप

**अकोला:** खदान परिसरात दोन संशयित व्यक्ती चोरीच्या उद्देशाने फिरत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. ही बाब लक्षात येताच परिसरातील काही नागरिकांनी तात्काळ त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र स्वतःला अडवले जात असल्याचे पाहून त्या संशयितांनी चाकू काढून नागरिकांवर हल्ल्याचा प्रयत्न करत तेथून पळ काढला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र धाडस दाखवत नागरिकांनी त्यांचा पाठलाग करत त्यापैकी एका चोरट्याला पकडण्यात यश मिळवले. संतप्त नागरिकांनी त्याला चोप दिला.

# आता गॅस सिलिंडर येणार केवळ 8 ते 10 किलोचे!

वृत्तसंस्था २३ मार्च



**नवी दिल्ली :** घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणात आता आणखी बदल करण्याचे सरकारने ठरवले आहे. घरगुती वापराचा गॅस सिलिंडर नागरिकांना आता अर्ध्याच वजनाचा मिळणार आहे. त्यामुळे तो कमी दिवस पुरणार असल्याने गृहिणींसह सर्वसामान्यांचे महिन्याचे बजेटच कोलमडणार असल्याने त्यांचासाठी हा निर्णय धक्कादायकच ठरणार आहे.

घरगुती वापराचा गॅस सिलिंडर १४.२ किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येतो. मात्र, आता हा घरगुती वापराचा गॅस ८ ते १० किलोच्या प्रमाणात नागरिकांना देण्यात येणार आहे. सिलिंडर तोच राहणार आहे. मात्र, त्यामध्ये गॅस आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्याचे आदेश गॅस कंपन्यांना देण्यात आलेत. जेवढा गॅस असेल तेवढे पैसे आकारले जाणार आहेत. युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या भरुन तयार असलेले १४.२ किलोचे सिलिंडर संपल्यानंतर नवीन सिलिंडर आठ ते दहा किलोच्या प्रमाणात भरण्यात येणार आहेत. त्यामुळे ते साहजिकच कमी दिवस पुरणार आहेत. त्यामुळे सामान्य घरातील दैनंदिन गणित बिघडणार आहे. यावर सामान्य नागरिक कशाप्रकारे व्यक्त होणार, हे बघावे लागेल. याशिवाय, कमी वजनाच्या या घरगुती गॅस सिलिंडरची किंमत किती असणार, याकडेही सगळ्यांच्या नजरा आहेत.

### युद्धाचा परिणाम सर्वसामान्यांच्या चुलीवर!

इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल हे युद्ध दिवसेंदिवस चिघळताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इस्रायलने इराणमधील गॅस फिल्ड आणि खनिज तेलाचे साठे असलेल्या परिसरांमध्ये हवाई हल्ले केले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने कतारमधील सर्वात मोठा नैसर्गिक वायूचा साठा असलेल्या परिसराला लक्ष्य केले आहे. यामुळे युद्ध संपल्यानंतरही या सुविधा पूर्ववत होण्यासाठी बराच वेळ जावा लागेल. त्यामुळे पुढील काही महिने जगभरात गॅसची टंचाई असेल, असा अंदाज आहे.

### युद्धामुळे मिनरल बॉटलच्या व्यवसायावर परिणाम

आखाती देशातील युद्धाचा परिणाम भारतातील व्यवसायावर झाले आहेत, नांदेडमधील मिनरल पाणी बॉटल तयार करणाऱ्या व्यवसायावर याचे परिणाम दिसून येत आहेत. बॉटलसाठी लागणारे रॉ मटेरीयलची आयात बंद आहे. प्रीफॉर्म, कॅप, लेबल, रॅपर रोल यांचे ६० टक्क्याने दर वाढले आहेत. त्यामुळे बॉटलीच्या दरात वाढ झाली आहे.

**CLASSIFIED**

**पाहिजे**

१) सुरक्षा रक्षक जेंट्स १५ पदे अमरावती, बडनेरा, अंजनगाव बारी करिता
२) वेटर १० पदे
३) कुक ३ पदे

-: संपर्क:-
DSS मोती नगर
मेन रोड अमरावती
9370030081
8421846450




## अशोक खरातला पोलिसांनी आणले वठणीवर!



प्रतिनिधी २३ मार्च

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात हा सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे. पोलिसांनी त्याला अटक केली असून त्याची कसून चौकशी सुरु आहे. राज्य सरकारने अशोक खरातच्या प्रकरणात स्थापन केलेल्या एसआयटीकडून आज चौथ्या दिवशीही तब्बल सात तास अशोक खरातची चौकशी करण्यात आली आहे. अशोक खरात याच्यावर आज आणखी एका महिलेने अत्याचाराची तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी अशोक खरात याच्या विरोधात आज दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. खरात याच्या एसआयटी चौकशीनंतर क्राइम ब्रांचने अशोक खरातचा ताबा घेतला. अशोक खरातला आज क्राइम ब्रांच युनिट एकमध्ये आणण्यात आले. या दरम्यान अशोक खरातचा एक नवा व्हिडीओ समोर आला आहे.



सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीवर अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करावेत

**अमरावती:** जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती अंतर्गत अशासकीय सदस्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. त्यामुळे रिक्त पदांवर नवीन सदस्यांची निवड करण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. यासाठी दि. २ एप्रिलपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

समितीच्या तरतुदीनुसार आणि नियम २००१ मधील निकषांनुसार, प्राणी क्लेश व्यवस्थापकीय समितीवरील सदस्य, गौशाळा किंवा पांजरापोळ संस्थेचे अध्यक्ष, प्राणी विषयावर कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेचे सदस्य, सर्वसाधारण समितीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती, मानवहित किंवा प्राणीमात्रांवर प्रेम करणाऱ्या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती अशासकीय सदस्यत्वासाठी अर्ज करू शकतील. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज २ एप्रिलपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

# बेरदा फाट्यावर मृत्यूचा सापळा!

## ट्रॅक्टरच्या धडकेत ४२ वर्षीय महिला ठार; आरोपी चालक काही तासांत गजाआड

प्रतिनिधी २३ मार्च

**धारणी :** मेळघाटातील धोकादायक वळणांच्या रस्त्यांवर वेगाचा कहर सुरूच असून, रविवारी दुपारी बेरदा-भूयूर त्रिफुलीवर भीषण अपघात झाला. ट्रॅक्टर आणि दुचाकीच्या जोरदार धडकेत ४२ वर्षीय मीरा राधेश्याम कासदेकर (रा. चाकरा, जि. खंडवा, मध्य प्रदेश) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकी चालक श्रीराम आसाराम काजले (वय ४०) हे गंभीर जखमी झाले आहेत.



माहितीनुसार, भारत जावरकर (वय ३०, रा. बेरदा) हा ट्रॅक्टरमध्ये लोखंडी साहित्य आणि मंडपाचे सामान भरून वेगाने जात होता. वेगावर नियंत्रण सुटल्याने त्याने समोरून येणाऱ्या दुचाकीला (क्र. एम.पी. ६८ झेड.डी. ५६४६) जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की दुचाकीचा पूर्ण चक्काचूर झाला आणि रस्त्यावर रक्ताचा सडा पडला.

अपघातानंतर चालक ट्रॅक्टरसह घटनास्थळावरून फरार झाला. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरुड आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला. आधुनिक स्थान शोधक तंत्रज्ञानाच्या मदतीने अवघ्या काही तासांत आरोपी चालकाला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

दरम्यान, गंभीर जखमी श्रीराम काजले यांना उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, मेळघाटातील वाढत्या बेशिस्त वाहतूक आणि वेगवान वाहनांमुळे अपघातांची मालिका कधी थांबणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

**शोध यंत्रणेमुळे आरोपी जेरबंद**

अपघात करून फरार झालेल्या चालकाला पकडण्यासाठी धारणी पोलिसांनी आधुनिक स्थान शोधक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचे अचूक ठिकाण शोधून काढत काही तासांतच त्याला अटक करण्यात आली.

# बडनेऱ्यात लता फिटनेस वर्ल्डचे आ. रवी राणा यांच्या हस्ते उद्‌घाटन

## महापौर श्रीचंद तेजवानी यांची उपस्थिती

प्रतिनिधी २३ मार्च

**अमरावती:** बडनेरा येथील नवीवस्ती परिसरात अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा 'लता फिटनेस वर्ल्ड' या व्यायामशाळेचे उद्‌घाटन आमदार रवि राणा यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या उद्‌घाटन सोहळ्याला महापौर श्रीचंद तेजवानी, युवा स्वाभिमान पार्टीचे गटनेते नाना आमले, नगरसेवक अजय जयस्वाल, नगरसेवक किशोर जाधव, नगरसेविका रंजनी डोंगरे, नगरसेविका गौरी मेघवानी तसेच बॉडी बिल्डर आयकॉन मनिष पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.



आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसते, त्यामुळे व्यायाम हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे.बडनेरा नवीवस्ती सारख्या भागात 'लता फिटनेस वर्ल्ड' सारखी सुसज्ज व्यायामशाळा सुरू होणे ही अतिशय आनंदाची बाब आहे. येथील युवकांनी मोबाईल व इतर व्यसनांपासून दूर राहून व्यायामाकडे वळावे, असे आ.रवि राणा यांनी आवाहन केले.

प्रत्येक परिसरात अशा व्यायामशाळा उभारल्या गेल्या, तर आपला समाज अधिक सक्षम, निरोगी आणि सशक्त बनेल. शासन स्तरावरही क्रीडा व फिटनेसला प्रोत्साहन देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत असे सुध्दा आ.रवि राणा यांनी बोलतांना सांगीतले. या प्रसंगी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नवीन पिढीला शारीरिक तंदुरुस्तीची सवय लागावी, यासाठी अशा व्यायामशाळांची आवश्यकता असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान व्यायामशाळेतील अत्याधुनिक उपकरणांची पाहणी करण्यात आली. प्रशिक्षित मार्गदर्शकांच्या मदतीने युवक-युवतींना योग्य व्यायामाची दिशा मिळणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.यावेळी जितु मोटवानी, गजानन सावंन, शैलेश मेघवानी, किशोर पिवाल, मुस्ताकभाई, प्रा.अमोल मिलके, पंकज शर्मा, राजु दामले, किशन कोतवानी, पवन भांडने, काळबांडे साहेब, सचिन पवार, हरभजनसिंग, पवन भोयर, अतुल नाचनकर, संगीता बैरमैय्या, वंदना पवार, पुजा दुबे, राज भैरव व असंख्य नागरीक उपस्थितीत होते.

# विद्यापीठात भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांचा 'शहीद दिन' संपन्न



प्रतिनिधी २३ मार्च

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात आला. याप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य युध्दातील योध्दा तसेच थोर क्रांतीकारक भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांचा शहीद दिन विद्यापीठात संपन्न झाला. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. नितीन कोळी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. शहीद भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांच्याबद्दल विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी माहिती दिली. शहीद दिन कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे रुळावर २४ वर्षीय तरुणाचा मृतदेह; घातपाताचा संशय, इर्विनमध्ये नातेवाईकांचा आक्रोश

प्रतिनिधी २३ मार्च

**अमरावती :** शहरातील सुशील नगर परिसरात रेल्वे रुळावर एका २४ वर्षीय तरुणाचा छिन्नविछिन्न अवस्थेत मृतदेह आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. शिवा राजू सरकटे (रा. दसरा मैदान झोपडपट्टी) असे मृत तरुणाचे नाव आहे. हा अपघात नसून घातपात असल्याचा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, अमरावतीहून बडनेऱ्याकडे जाणाऱ्या रेल्वेसमोर एक तरुण आल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांनी राजापेठ पोलिसांना दिली. माहिती मिळताच ठाणेदार पुनीत कुलट यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) उत्तरीय तपासणीसाठी पाठवला.

दरम्यान, शिवाचा मृत्यू अपघात नसून त्याला मारून रुळावर टाकण्यात आले असावे, असा संशय व्यक्त करत नातेवाईकांनी इर्विन रुग्णालयात मोठा आक्रोश केला. काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी शीघ्र कृती दलाला पाचारण केले. वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि साहाय्यक पोलीस आयुक्तांनी घटनास्थळी धाव घेऊन नातेवाईकांची समजूत काढली.

लोहमार्ग पोलिसांकडून मिळालेला अधिकृत मेमो नातेवाईकांना दाखवण्यात आला. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. सध्या या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस सखोल तपास करत आहेत.

**न्यायासाठी नातेवाईकांचा टाहो**

शिवा राजू सरकटे यांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हा घातपात असल्याचा आरोप करत नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयात ठिय्या मांडला होता. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून सर्वांना संयम राखण्याचे आवाहन केल्याने पुढील अनर्थ टळला.

# दर्यापूरातील श्रीराम जन्मोत्सव : भक्ती, कला आणि एकात्मतेचा अविस्मरणीय सोहळा

प्रतिनिधी २३ मार्च

**दर्यापूर:** नगरीत वसलेले पुरातन आणि ऐतिहासिक श्रीराम मंदिर हे केवळ एक देवस्थान नसून, अनेक पिढ्यांच्या श्रद्धा, संस्कार आणि अखंड भक्तीचे जिवंत प्रतीक आहे. या पवित्र स्थळी साजरा होणारा श्रीराम जन्मोत्सव म्हणजे दर्यापूरकरांसाठी एक भावनिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्वणीच ठरते. मंदिरात प्रवेश करताच समोर उभे असलेले प्रभू श्रीराम, माता सीता आणि भगवान लक्ष्मण, तसेच त्यांच्या चरणी नतमस्तक उभे असलेले भक्त हनुमान यांचे दर्शन मनाला विलक्षण शांतता प्रदान करते. त्या क्षणी बाहेरचा गोंगाट, ताणतणाव आणि दैनंदिन धावपळ सगळं विसरायला होतं, आणि मन पूर्णपणे रामभक्तीत तल्लीन होतं.

उत्सवाच्या काळात मंदिर परिसर पूर्णतः भक्तिमय होऊन जातो. कीर्तन, भजन, हरिपाठ, गायन आणि पारंपरिक नृत्य यांच्या माध्यमातून श्रीरामांच्या आदर्श जीवनाचा संदेश प्रत्येकाच्या मनापर्यंत प्रभावीपणे पोहोचतो.

या उत्सवानिमित्त विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ह.भ.प. श्री रामनाथ रामचंद्र अय्यर बुवा (पुणे) यांचे जाहीर कीर्तन आयोजन. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून भक्ती, ज्ञान आणि संस्कारांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळतो, ज्यामुळे संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय आणि प्रेरणादायी बनते. या सर्व कार्यक्रमांचे उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध नियोजन विश्वस्त मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात येते.

# विधानसभा आश्वासन समितीचा दणका : सिंभोरा धरण पाणीपुरवठा योजनेवर मंत्री पाणी पुरवठा यांचे कडे निर्णायक बैठक, आ. रवी राणा उपस्थित राहणार

प्रतिनिधी २३ मार्च

**अमरावती :** अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती विधानभवन व आमदार रवी राणा यांनी सिंभोरा धरणामार्फत शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेत येणाऱ्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रश्न विधानसभा सभागृहात मांडला होता.आता ते स्वत: समिती चे अध्यक्ष आहेत: या संबंधाने हालचाली सुरू झाल्या आहेत. पाईपलाईन संदर्भातील तांत्रिक अडचणींमुळे पाणीपुरवठा सुरळीत होत लवकर कार्यान्वित करण्यासाठी मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली बैठक निर्णय घेण्यासाठी तारीख २४ मार्च रोजी दुपारी १:०० वाजता ही बैठक आयोजित केली आहे.बैठकीचे पत्र मंत्रालयाचे अधिकारी अंजली बोडके यांनी पाठविले आहे आमदार रवी राणा हे उपस्थित राहणार असून अंदाजे १००० कोटी रुपयांचे योजनेचे संबंधी डिटेल आढावा घेतील.

या पार्श्वभूमीवर नेरपिंगळाई बीपीटीपर्यंत पाणीपुरवठा सक्षम करण्याच्या विषयावर दिनांक २४ मंगळवार रोजी दुपारी मंत्रालयात महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, विधानसभा आश्वासन समितीचे सदस्य आमदार रवी राणा यांच्या पाठपुराव्यामुळे हा विषय गतीमान झाला आहे.

सदर विषय हा आश्वासन क्रमांक ७९ अंतर्गत असून, त्यानुसार अनुपालन सादर करण्याबाबतही या बैठकीत चर्चा होणार आहे. संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहून सविस्तर मांडणी करणार आहेत.

या बैठकीत सिंभोरा धरणपासून अमरावती शहराला पाणीपुरवठा योजनेवर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.असून, जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या या योजनेला गती देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# वाढत्या उन्हाचा फटका: प्राथमिक शाळांच्या वेळेत बदलाची मागणी

प्रतिनिधी २३ मार्च



**अमरावती :** जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्याह पार्श्वभूमीवर प्राथमिक शाळांच्या वेळेत बदल करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. याबाबत शुक्रवार, २० मार्च रोजी जिल्हा परिषद सिईओ आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनानुसार, २० मार्च २०२६ पासून जिल्ह्यातील प्राथमिक शाळा सकाळच्या सत्रात सुरू असून, सध्याची वेळ ७.१५ ते १२.१५ अशी आहे. मात्र अमरावतीतील वाढते तापमान, लहान वयोगटातील विद्यार्थी आणि बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेता ही वेळ सकाळी ७ ते ११ अशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सध्या माध्यमिक शाळांची वेळ सकाळी ७ ते ११ अशी आहे. त्याच्या तुलनेत प्राथमिक शाळांची वेळ अधिक असल्याने लहान विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची भावना शिक्षक व पालकांनी व्यक्त केली आहे. मोठी मुले ११ वाजता घरी परतत असताना, प्राथमिक शाळांतील लहान मुले दुपारच्या वाढत्या उन्हात शाळेतच थांबत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या हितासाठी शाळांच्या वेळेत तातडीने बदल करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी अजयानंद पवार, शैलेंद्र दहातोंडे, मनोज ओळंबे उपस्थित होते. तसेच कॉस्टट्राइक शिक्षक संघटनेचे राजेश गाडे, पंडित भोयरही उपस्थित होते.

# आ. रवी राणा यांच्या उपस्थितीत संजय भारसाकळे व भूषण भारसाकळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

प्रतिनिधी २३ मार्च

**अमरावती :** अमरावती शहरातील शंकर नगर येथील युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यालयात आज एक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली. दर्यापूर येथील उद्योजक व समाजसेवक संजय भारसाकळे व भूषण भारसाकळे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह युवा स्वाभिमान पार्टीत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा आमदार आ. रवि राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



या वेळी YSP मार्गदर्शक सुनिल राणा, नगरसेवक प्रशांत वानखडे, तसेच कोअर कमेटीचे सदस्य जयंतराव वानखडे, सुखदेव तरडेजा, प्रमोद येवतीकर, किशोर पिवाल, सुरेश पडोळे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी नव्याने प्रवेश घेतलेल्या कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आ. रवि राणा यांनी बोलतांना सांगीतले की, संजय भारसाकळे व भूषण भारसाकळे यांच्या सामाजिक व व्यावसायिक कार्याचा गौरव करत, त्यांच्या प्रवेशामुळे पक्ष अधिक बळकट होणार असल्याचे सांगितले. त्यांनी पुढे नमूद केले की, युवा स्वाभिमान पार्टी ही सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारी पार्टी असून नव्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे पक्षाची ताकद आणखी वाढेल.

संजय भारसाकडे व भूषण भारसाकडे यांनीही पक्षाच्या विचारसरणीवर विश्वास व्यक्त करत, जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा संकल्प केला. त्यांनी सांगितले की, दर्यापूर तालुक्यातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी ते पक्षाच्या माध्यमातून सक्रिय भूमिका निभावतील. या जाहीर प्रवेशामुळे दर्यापूर तसेच अमरावती परिसरात युवा स्वाभिमान पार्टीची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

# वाशिममध्ये पोलीस-आर्मी भरती प्रशिक्षण योजनेला सुरुवात : एससी विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

प्रतिनिधी २३ मार्च

**वाशिम :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण योजनांमुळे समाजातील वंचित घटकांना नवी दिशा मिळत आहे. त्याचाच एक भाग म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे तसेच अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती (SC) समाजातील विद्यार्थ्यांसाठी पोलीस व आर्मी भरती प्रशिक्षण योजना वाशिम येथे सुरू करण्यात आली आहे. या योजनेमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत प्रवेश करण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

सदर प्रशिक्षण योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील ठहितोपदेशक बौद्धशिक्षण संस्थाठ या संस्थेला प्रशिक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिक तसेच लेखी परीक्षेसाठी सर्वसमावेशक प्रशिक्षण दिले जात आहे. सध्या या योजनेअंतर्गत अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या मार्फत दहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या मार्फत पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

# पाच दशकांपासून मोफत काढा वितरण करणारा वाघ परिवार

## गुढीपाडवा ते रामनवमी पर्यंत राबविण्यात येतो उपक्रम

प्रतिनिधी २३ मार्च

**खामगाव:** आयुर्वेदात गुळवेल, कडुलिंब व अडुळसा मानवाचे हे शरीर निरोगी राखण्यासाठी एक उत्तम औषध आहे. ही बाब हेरून वैद्य स्व.किसन दगडू वाघ यांनी ५० वर्षांपूर्वी गुढीपाडवा ते रामनवमी पर्यंत गुळवेल व कडुलिंबाचा काढा मोफत वितरणाचे कार्य सुरू केले होते. त्यांचे हे कार्य आज तिसऱ्या पिढीतील सुटाळाखुर्द निवासी संजय व शिवाजी वाघ राबवत आहेत. मोफत काढा वितरणाला



१९ मार्च २६ पासून आरंभ झाला असून २६ मार्च म्हणजे गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत करण्यात येणार आहे. दररोज १५० लिटर गुळवेलचा व १५० लिटर कडुलिंबाचा काढा तयार करून त्याचे वितरण पहाटे ५ वाजता पासून ते काढा संपेपर्यंत सुटाळा खुर्द फाट्याजवळ करण्यात येत आहे. हा काढा तयार करण्याचे कार्य पाहाटे ३ वाजता पासून सुरू करण्यात येते हा काळा तयार करण्यात येत आहे याला तब्बल दोन तासाचा कालावधी लागतो वाघ परिवारातील भगवान किसन वाघ, जयवंता भगवान वाघ, भरत भगवान वाघ, उषा भरत वाघ, विशाल भरत वाघ, सपना भरत वाघ, संजय भगवान वाघ, संगीता संजय वाघ, रितेश संजय वाघ, मनाली संजय वाघ, शिवाजी भगवान वाघ, नीता शिवाजी वाघ, सृष्टी शिवाजी वाघ, तनुश्री शिवाजी वाघव रुख्मीणी भागवत इंगळे हे करीत आहे. त्यांना गुळवेलच्या काड्या कुटण्यासाठी संजीवनी राऊत, निशा खंडारे, शारदा राऊत, रुख्मीणी इंगळे, आशा लहासे, श्रीमती काळे, श्रीमती गोरे यांचे सहकार्य लाभत आहे. सुटाळा खुर्द फाट्यावर लावण्यात आलेल्या स्टॉलवर कोणत्याच प्रकारचा भेदभाव न करता याचे वितरण करण्यात येत आहे.

**लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला**

**ई- निविदा सुचना क्र. ०६**

**सन २०२५-२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथील जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत **१) मौजे कापशी येथील सिमेंट नाला बंधारा बांधकाम क्र. ०२ ता. अकोला २) मौजे कापशी येथील सिमेंट नाला बंधारा बांधकाम क्र. ०१ ता. अकोला ३) मौजे कापशी येथील कोल्हापुरी पद्धत बंधारा बांधकाम, क्र.०१ ता. अकोला** कामाचे निविदा सदर निविदा प्रक्रिया हि जलसंपदा विभाग शा. नि. दिनांक १८/१०/२०२३ व दिनांक ०१/०८/ २०२५ जलसंधारण विभाग शा. नि. ०३/०१/२०२३ ग्रामविकास विभाग शा. नि. दिनांक २३/०९/२०१३ व दिनांक ०८/१०/२०२१ च्या अनुषंगाने राबविण्यात येत आहे. ई- निविदा प्रक्रिया योग्य त्या प्रवर्गा कडुन खुल्या ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात येत आहे.

सदर ई- निविदा सुचना क्र. ०६ सन २०२५-२०२६ दिनांक २४ मार्च २०२६ रोजी सविस्तरपणे खालील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

Main Portal - https://mahatenders.gov.in

**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, अकोला

# सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने संगीतमय शिवपुराण कथेचे आयोजन

**अकोला:** गत एकवीस वर्षापासून अनेक सेवाभावी उपक्रम राबविणाऱ्या दाबकी रोडच्या कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने वानखडे नगर येथील कर्ता हनुमान मंदिर परिसरात वार्षिक संगीतमय शिवपुराण कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रामनवमी ते हनुमान जयंती पर्यंत चालणारा हा उत्सव रामनवमी गुरुवार दि २६ मार्च ते गुरुवार दि २ एप्रिल पर्यंत चालणार आहे. गुरुवर्य वासुदेव महाराज व श्रीराम महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित या उत्सवात नित्य साय ६-३० वा ते रात्री १० वाजेपर्यंत जिल्ह्यातील पाळोदी येथील कथा वाचक हभप राजेंद्र महाराज वकटे शिवपूराण कथा सादर करणार आहेत. या कथेत बुधवार दि १ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता वारी भैरवगड येथील ज्ञानेश आश्रमाचे संस्थापक हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन होणार असून गुरुवार दिनांक २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता कथाकार हभप राजेंद्र महाराज वकटे यांच्या काल्याच्या कीर्तनाने या शिवपुराण कथेची सांगता होणार आहे.

## योगीराज महिला भजनी व पारायण मंडळाच्या वतीने मतिमंद विद्यार्थ्यांना भोजनदान



**अकोला:** सामाजिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या जुने शहरातील योगीराज महिला भजनी व पारायण मंडळाच्या वतीने शेगाव येथील मतिमंद विद्यार्थ्यांना भोजनदान सेवा उपक्रम राबविण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्त महिला पदाधिकाऱ्यांनी बाळापुर रोड शेगाव येथील सिद्धपीठ महालक्ष्मी मंदिर येथे भेट देऊन मंदिर दर्शन करून वारी उपक्रम राबविला यावेळी पदाधिकाऱ्यांनी संत गजानन महाराज निवासी मतिमंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सुग्रास भोजन सेवा उपलब्ध करून दिली. यानंतर महिला मंडळाने संगीतमय भजने सादर करीत आगळ्यावेगळ्या पद्धतीने मंडळाचा वारी उपक्रम राबविला. यावेळी मंदिराचे अध्यक्ष गजानन वाघ यांनी महिला पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.

## सद्गुरूची कृपा हीच यशस्वी जीवनाची फलश्रुती -हभप ऐवज भांडारे

**अकोला:** जीवनात यशस्वितेसाठी ज्या प्रमाणे प्रयत्नांची गरज असते तशीच गरज सदगुरुची सुद्धा जीवनात असते. किंबहुना सद्गुरूची कृपा हीच यशस्वी जीवनाची फलश्रुती असून अश्या सदगुरुची कृपा प्राप्त करण्यासाठी गुरुची सेवा आवश्यक असल्याचा हितोपदेश इंदोर येथील कीर्तनकार हभप ऐवज भांडारे यांनी केला. स्थानिक श्रीराम व हरिहर संस्थान संचालित टिळक रोडवरील मोठ्या राम मंदिरात सुरू असलेल्या श्रीरामनवमी उत्सव कीर्तनात हभप भांडारे यांनी कीर्तनाचे तृतीय पुष्प गुंफले. ते म्हणाले, जीवनात प्रयत्न फ़ार महत्वाचा आहे. यश व सफलतेसाठी कुठलाच शॉर्टकट उपलब्ध नसून प्रयत्न हाच एकमेव मार्ग आहे.

## अहंकाराची लंका जाळण्यासाठी श्रद्धेचा 'सेतू' हवा- डॉ. भूषण फडके

प्रतिनिधी २३ मार्च




**अकोला:** 'जेव्हा आपण स्वतःला 'मी' म्हणून मोठे करतो, तेव्हा संकटाचे तोंड सुरसेसारखे मोठे होते. पण जेव्हा आपण 'मी'पणाचा त्याग करून लघुरूप (नम्र) होतो, तेव्हा कोणत्याही संकटाच्या मुखातून सुरक्षित बाहेर पडू शकतो,ठ असे प्रतिपादन प्रसिद्ध रामकथाकार डॉ. भूषण फडके यांनी केले. अकोला येथे निलेश देव मित्रमंडळ आयोजित 'संगीतमय श्रीरामकथा' महोत्सवाच्या चौथ्या पुष्पात ते 'सुंदरकांड' आणि 'युद्धकांडा'तील व्यवस्थापन सूत्रांवर निरूपण करत होते.

आजच्या कथेत हनुमानाचे समुद्र उल्लंघन, सीता शोध, रावण-हनुमान संवाद, लंकादहन, बिभीषण शरणागती, सेतुबंधन आणि अंगद शिष्टाई या प्रसंगांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले.

डॉ. फडके यांनी हनुमंताच्या कार्याला शेगावचे संत गजानन महाराज यांच्या आध्यात्मिक शिकवणुकीची जोड दिली. ठभक्ती, शक्ती आणि चातुर्य यांचा त्रिवेणी संगम म्हणजे वीर हनुमान, तर शक्ती आणि अहंकार यांचे प्रतीक म्हणजे रावण. हनुमंताने समुद्र ओलांडताना मैनाक पर्वताचा आदर केला(स्पर्श केला), पण ते तिथे विश्रांतीसाठी थांबले नाहीत. गजानन महाराज नेहमी म्हणायचे, ठउपाधीत अडकू नकाठ. संसारात मान-सन्मान मिळतील, पण त्यात न अडकता आपले 'ध्येय' (रामकार्य) विसरू नये, हाच महाराजांचा आणि हनुमंताचा संदेश आहे.

याप्रसंगी विविध भक्तीगीतांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. देवाशिष फडके याने ठसेतुबंध रे सागरीठ, हे राम हे राम तर निखील देशमुख यांनी पेटवी लंका हनुमंत, विश्वाचा विश्राम रे, सुग्रीव हे साहस असले, वैशाली फडके यांनी, गजाननच्या चरणी जुळवू या आपुले नाते, श्रीराम गजर तर सुमंत तरालकर यांनी अविरत ओठी हि गीते सदर केली. ठगण गणात बोतेठ या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. हार्दिक दुबे, आणि विग्नेश बोकसे यांनी साथ सांगत केली. कथेला भाविकांची अलोट गर्दी होत आहे.

## हिवरखेड शहरात गणगौर विसर्जन उत्साहात साजरे



प्रतिनिधी २३ मार्च

**हिवरखेड:** येथे राजस्थानी संस्कृतीचा जोमाने भरलेला गणगौर हा सण होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होतो आणि १६ दिवस चालतो. हा सण शिव आणि पार्वतीचे प्रतीक आहे. पौराणिक कथा अशी आहे की, महाशिवरात्रीला भगवान शिवाचे लग्न झाले, त्यानंतर माता पार्वती १६ दिवसांसाठी येते आणि १६ व्या दिवशी भगवान शिव तिला घेण्यासाठी येतात. हा सण त्याचेच प्रतीक आहे. त्या शिवपार्वतीची गणगौरच्या रूपात पूजा केली जाते. होळीच्या दुसऱ्या दिवशी, अविवाहित मुली १६ दिवस तिची पूजा करतात आणि आपल्या चांगल्या वरासाठी प्रार्थना करतात. नववधू अखंड विवाहाचे वरदान मागतात आणि १६ व्या दिवशी गौर माता तिच्या सासरच्या घरी जाते. हिवरखेडमध्ये तिचा निरोप सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला त्यात संपूर्ण राजस्थानी महिला मंडळ सह, माहेश्वरी महिला मंडळ उपस्थित होते असे सांगण्यात येते. यात संपूर्ण शहरातून मिरवणूक काढण्यात आली. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा ममता राठी व सचिव सौ. वैशाली राठी यांच्या मार्गदर्शनाखाली ममता राठी, वैशाली राठी, रेखा पोपलिया, पुनम राठी, किरण लखोटिया, कीर्ती सदानी, सारिका जाजू व राजस्थानी समाजातील सर्व महिलांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अतिशय उत्तम प्रकारे पार पडला.

## रोजगारासाठी दिव्यांग सोशल फाउंडेशनतर्फे आर्थिक सहकार्य

प्रतिनिधी २३ मार्च



**अकोला:** दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांग शिक्षण, रोजगार व आरोग्यासाठी विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहेत. दिव्यांग बांधवांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शनासोबतच उद्योग व्यवसाय करण्यासाठी आर्थिक सहकार्य संस्थेतर्फे दिले जात आहे. २०२५/२६ या आर्थिक वर्षात दिव्यांग उद्योजिका शांताबाई केदार यांना रुपये ११००० व दिव्यांग तबलावादक कैलास पानबुडे यांना रुपये २००० चे आर्थिक सहकार्य दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष डॉ विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. संस्थेच्या सामाजिक उपक्रमांना संपूर्ण भारतातून दानशूर व्यक्ती आपले आर्थिक सहकार्य देत असल्याने हे कार्य सहज होत असल्याची प्रतिक्रिया सहसचिव डॉ.संजय तिडके यांनी व्यक्त केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दिव्यांग बांधवांच्या सुरातून संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण विदर्भात करण्यात येणार असल्याची माहिती सचिव पूजा गुंटीवार यांनी दिली. ज्या दिव्यांग बांधवांना संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर नोंदणी करावी असे आवाहन उपाध्यक्ष प्रा.अरविंद देव यांनी केले आहे.

## लोहारा शिवारात जुगार अड्ड्यावर एलसीबीची कारवाई; १७ जण ताब्यात

प्रतिनिधी २३ मार्च



**हातरूण:** उरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या लोहारा येथील माता कमान परिसरात व एका शेतात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. 'एक्का बादशहा' या जुगारावर चालणारा अड्डा उद्ध्वस्त करत पोलिसांनी १७ जणांना ताब्यात घेतले असून लाखो रुपयांचा मुद्देमाल व रोख रक्कम जप्त केली आहे.

ही कारवाई शनिवार, २१ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून लोहारा येथील आसरा माता कमानजवळील एका शेतात मोठ्या प्रमाणात जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या गोपनीय माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने छापा टाकत संयुक्त कारवाई केली.

या कारवाईत मंगेश तेजराव हिंगणे (वय ४०), धर्मा गणेश सारवान (वय ३०), संतोष रामगीरी (वय ५२), निखिल श्रीकृष्ण अग्रवाल (वय ३५), अक्षय संतोष मोहोळ (वय २४), अजय लक्ष्मण चांडाळणे (वय ४५), सचिन बाबुराव कोकाटे (वय ४०), गणेश महादेव ताठोडे, सतीश गोपाल जगळे (वय २४), अमित देशमुख (वय ४३), आसिफ लतीफ देशमुख (वय ४८), गजानन वसंत देशमुख (वय ३५), सागर संजय खान झोडे (वय ३५), सागर साहेबराव (वय ४०), नैनेश्वर सुरेश घारमोडे (वय ४०), अंकुश श्रीराम मेटांगे (वय ३२) आणि आशीष डिगंबर टाकरे (वय ३५) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

छाप्यादरम्यान अनेक दुचाकी व चारचाकी वाहनेही जप्त करण्यात आली असून काही जण घटनास्थळावरून फरार होण्यात यशस्वी झाले आहेत. या जुगार अड्ड्यावर आंतरजिल्ह्यातील जुगारी मोठ्या प्रमाणात सहभागी होत असल्याची माहिती आहे. उरळ पोलिस तपास करीत आहेत.

## शिवाजी चौकात श्रीमद् भागवताचे आयोजन

प्रतिनिधी २३ मार्च



**अकोला :** वै. गुरुवर्य श्री वासुदेव जी महाराज यांचे कृपाप्रसादाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आई तुळजाभवानी मंदिर शिवसेना वसाहत राजे शिवाजी चौक येथे दिनांक २६ मार्च ते ४ एप्रिल श्रीमद् भागवताचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते श्री ह भ प लक्ष्मण महाराज आनंदे यांचे संगीतमय भागवत आयोजित केले आहे भागवत ग्रंथ पूजन श्री दिलीपराव देशमुख सौ कविताताई दिलीप देशमुख यांच्या शुभहस्ते होणार असून भागवत कथा यजमान संतोष बुरडे सौ संगीता संतोष बुरडे हे आहेत सप्ताहातील दैनंदिन कीर्तनकार हरीश महाराज खंडारे चिंचोली, अरुण महाराज सावंत मेहकर, कु. कृष्णाली ताई गावंडे बाल कीर्तनकार अकोला, उमाशंकर महाराज आर्य मोठी उमरी, दिनेश महाराज डोईफोडे दारापूर, रविंद्र महाराज खेडेकर खामगाव कीर्तनकार राहील.

## पुरुषोत्तम शिंदे अकोला वैभव पुरकाराने सन्मानित

प्रतिनिधी २३ मार्च



**अकोला:** माऊली फांउडेशन तर्फे वार्षिक पुस्काराची घोषणा गुढीपाडवाच्या मुहर्तावर करण्यात आली. सन २०२६ मधील प्रथम पुररकार शहरातील पुरुषोत्तम शिंदे हे नियमित स्वरुपात गोर - गरिबाची सेवाकरत आदिवासी बांधवाची दिवाळी साजरा करण्याचा भरीव उपक्रम दरवर्षी सामाजिक कर्तृज्ञता याभावनेने व्यक्त करतात या कार्याची दखल घेवून माऊली फांउडेशन पुरुषोतम शिंदे याना मित्र परिवारात उपस्थितीत अकोला वैभव पुरस्कार संबधी ममोटो - धनादेश - शाल - पुष्पगुच्छ मान्यवरांच्या उपस्थितीत बहाल करून गौरवपुर्ण कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी फांउडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडेकर, उपाध्यक्ष श्रींकात जोशी, सैय्यद रब्बानी, सचिव अशोक पारधी, संचालक मंगेश लांडे सह विजयराव देशमुख, अनिलभाऊ कौसल, शरद मसने, विष्णू उमरकर, रविन्द्र जाधव, पांडुजी घोडे, अनिल अवचार, सुनिल साखरकर, गोपालसिंग ठाकूर आदि मान्यवर उपस्थित होते.

## निधन वार्ता

### सुरेश नांदुरकर



**अकोला :** न्यू तापडिया नगर मधील रहिवासी सुरेश दत्तात्रय नांदुरकर यांचे २२ रोजी दुपारी हृदयविकारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

## शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ

प्रतिनिधी २३ मार्च




**अकोला :** स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत पदवी वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.एम.साबू हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. श्रीनिवास सातभाई शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, कला विभाग प्रमुख डॉ शिवाजी नागरे, विज्ञान विभाग प्रमुख डॉ प्रसन्न पांडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ अर्चना खंडेलवाल, अधीक्षक निशिकांत देशपांडे उपस्थित होते.

विद्यापीठाच्या परीक्षेत प्राविण्य तथा पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी देऊन सत्कार करण्यात आला. यात प्रामुख्याने वैष्णवी खवले, श्रेया पाटील, सानिका बानाईत, ओम इंगोले, भूमिका वाइन्देश्वर, स्नेहा पाली, शितल साखरे, वैष्णवी बेलांगे, रूपाली चव्हाण, श्रद्धा शुक्ला साक्षी भिसे, ज्ञानेश्वरी खेळकर, इशिका पाटीदार, प्रणाली लंगोटे, पूजा लंगोटे, माधुरी लाटे, राणी पोहरे, हर्षा निंबेकर यांना प्रतिनिधिक स्वरूपात पदवी वितरण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. श्रीनिवास सातभाई यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग चांगल्या कामाकरिता करावा. विद्यार्थ्यांनी कुठले तरी कौशल्य प्राप्त करून जीवनात ते अंगीकारावे. कार्यक्रमाचे संचालन डॉ.जयश्री सकळकळे व डॉ. डिंपल मापारी यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालयात जागतिक जल दिन व हवामान दिन साजरा

वि. प्रतिनिधी २३ मार्च



**अकोट:** रुईखेड येथे बागाजी विद्यालय, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात हरित सेना, स्काऊट गाईड व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र अकोट च्या सयुक्त विद्यमाने चिमणीदिन, वन दिन, जागतिक जल दिन व जागतिक हवामान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी विद्यालयातील जेष्ठ शिक्षिका अनिता भराटे होत्या.

मुख्याध्यापक निनाद मानकर यांनी विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्व सांगून, पाण्याचा सुयोग व विवेकी वापर, पाण्याचे सवर्धन व जतन, पाण्याविषयाचे कायदे, नियम, पाण्याची स्वच्छता, पावित्र्य जपन अशा सामाजीक बांधिलकीची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे आयोजन हरित सेना प्रभारी विशाल मांडवे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन संतोष काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिल ओखारे यांनी केले. कार्यक्रमात संपूर्ण विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जल दिनानिमित्य सामूहिक जलप्रतिज्ञा केली. विद्यार्थ्यानी पाणी अडवा, पाणी जिरवा, पाणी वाचवा, पर्यावरण वाचवा, प्रदुषण टाळा, प्लास्टिक चा वापर टाळा अशा प्रकारच्या जनजागृती बद्दल च्या घोषणा दिल्या. भराटे, किरण मानकर, वनिता सरोदे, संतोष काळे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा.रूपेश गायगोले, प्रा.राहुल खंडारे, संगीता पन्नासे, संगीता नाथे, जानव्ही गाठेकर, शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे, श्री काळमेघ व त्याच बरोबर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आमदार स्व. रामाभाऊ कराळे स्मृती चषक : चॅम्पियन्स ट्रॉफी २०२६ चा जल्लोषात समारोप

वि. प्रतिनिधी २३ मार्च




**अकोट:** अकोट क्रिकेट चॅम्पियन्स मल्टिटास्किंग असोसिएशन अकोट अंतर्गत अकोट सी. सी. क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित माजी आमदार स्व. रामाभाऊ कराळे स्मृती चषक अंतर्गत चॅम्पियन्स ट्रॉफी – २०२६ स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण सोहळा नेहरू पार्क येथे झाला.

प्रथम फलंदाजी करताना विक्की द रेसर ११ संघाने १२ षटकांत ९ बाद ११९ धावा केल्या. यात विक्की मंडले यांनी १८ चेंडूत ४३ धावांची आक्रमक खेळी करत संघाला भक्कम धावसंख्या उभारून दिली. प्रत्युत्तरादाखल मल्हार द चँप ११ संघाने दमदार फलंदाजी करत १०.२ षटकांत केवळ २ गडी गमावत लक्ष्य गाठले. गोविंद वर्मा, अभिषेक गोतरकर आणि रितेश मंडले यांच्या प्रभावी खेळीमुळे मल्हार संघाने एकतर्फी विजय मिळवला. गोविंद वर्मा यांनी १४ चेंडूत २१ धावा करत २ षटकांत ११ धावा देत २ बळी घेतल्यामुळे त्यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संदीप बोबडे होते. प्रमुख अतिथी मनीष रामाभाऊ कराळे, रविभाऊ ठाकूर, मनोज चंदन, बजरंग मिसळे, आदर्श शिक्षक अश्विन हिंगणकर उपस्थित होते. तसेच सचिव भास्करराव वानखडे व मॅनेजर गोविंद वर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत रामाभाऊ कराळे यांना अभिवादन करून करण्यात आली. प्रास्ताविक भास्करराव वानखडे यांनी केले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

निस्वार्थ सेवा सन्मान – गणेश धुराटे, बेस्ट ऑफलाईन स्कोअरर विनोद बुंदे, रमेश पानझाडे, बेस्ट ऑनलाइन स्कोअरर – निलेश गौड, शुभम सुंडेवाले, बेस्ट पंच – संदीप उन्होंने, संदीप राठोड, श्याम संतानी, बेस्ट तिसरे पंच – विजय मानकर, विशेष सीसी क्लब व्यक्तिमत्व पुरस्कार २०२६ – अविनाश अरबट, चेतन भगत, उत्कृष्ट आयोजक विजय बेदरकर, बेस्ट बॉलर राहुल वर्मा, बेस्ट बॅटर व मॅन ऑफ द सिरीज – विक्की मंडले, फायनल सामनावीर – गोविंद वर्मा.

विजेता मल्हार द चँप संघाला (७००० + ट्रॉफी), उपविजेता विक्की द रेसर संघाला (३००० + ट्रॉफी) दिले.

कार्यक्रमाला क्लबचे उपाध्यक्ष राजेंद्र मुऱ्हेकर, सहसचिव अँड. सुनील धुळे, कोषाध्यक्ष मंगेश जुनारे, कार्याध्यक्ष विजय बेदरकर, विधी सल्लागार अँड. मनोज वर्मा, मॅनेजर श्याम संतानी यांच्यासह अनेक सदस्य व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय बेदरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अनिल बाभूळकर यांनी केले. सामन्यादरम्यान विजय बेदरकर व हर्षल मानकर यांनी समालोचन केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. २३ मार्च २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# शॉर्टसर्किटने आग ; घरासह ॲक्वा केंद्र जळून खाक

प्रतिनिधी २३ मार्च

**दारव्हा :** शहरातील लड्डा नगर परिसरात शनिवारी रात्री शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून एका घरासह जलगंगा ॲक्वा केंद्राची राखरांगोळी झाली. या आगीत अंदाजे २६ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

आशिष सतिश गिरी यांच्या मालकीचे घर व ॲक्वा व्यवसाय एकाच ठिकाणी असल्याने आगीने काही क्षणातच उग्र रूप धारण केले. घरातील धान्य, कपडे, संसारोपयोगी साहित्य, रोख रक्कम तसेच ॲक्वा सयंत्रे पूर्णपणे जळून खाक झाली.





आग लागल्याचे लक्षात येताच नागरिकांनी तत्काळ नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाला माहिती दिली. मात्र, अग्निशामक वाहन पोहोचण्यास झालेल्या विलंबामुळे आग आटोक्यात आणण्यास अडचणी आल्या. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली; मात्र आशिष गिरी हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे गिरी कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यांची परिस्थिती लक्षात घेऊन आदर्श शिक्षक रामकृष्ण सातव यांनी सामाजिक माध्यमांद्वारे मदतीचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी मदतीचा हात पुढे केला आहे.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विद्युत सुरक्षेबाबत अधिक दक्षता घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## पिंपळगावात चोरी, दुचाकीवर आलेल्या तिघांवर फोकस

प्रतिनिधी २३ मार्च

**नेर :** पिंपळगाव डुब्बा येथे शनिवारी रात्री घरफोडी झाली. चोरट्यांनी कपाटातील रोख १५ हजार रुपये लंपास केले. पोलिसांनी गावातील एका ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेज तपासले. त्यात दुचाकीवर तीन जण संशयास्पद स्थितीत घटनास्थळ परिसरात दिसत असल्याचे सांगण्यात आले.

जितेंद्र नागोराव देवकते यांच्या घरी ही चोरी झाली. ते अमरावती येथे वास्तव्याला आहे. त्यांची आई अधूनमधून पिंपळगाव येथे राहते. त्या अमरावती येथे असल्याने घर बंद होते. हीच संधी चोरट्यांनी कुलूप फोडून घरातील अलमारी उघडून रोख रक्कम चोरून नेली. रविवारी सकाळी शेजाऱ्यांना घराचे दार उघडे दिसल्याने हा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी नेर पोलिसात तक्रार देण्यात आली असून, तपास सुरू करण्यात आला आहे. दुचाकीवर आलेल्या तिघांवर फोकस करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील बंद घरेही चोरट्यांनी आपले लक्ष्य केले आहे. घरी कोणी नसल्याची संधी साधत घरफोडी करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्येही भीती निर्माण झाली आहे. कामे करायची की घर राखायचे, हा प्रश्न त्यांच्यापुढे आहे.

# आखाती तणावाचा परिणाम ; गव्हाचे दर घसरले



प्रतिनिधी २३ मार्च

**यवतमाळ :** आखाती देशांतील तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम आता ग्रामीण बाजारपेठांवर दिसू लागला असून, जिल्ह्यात गव्हाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. अपेक्षित भाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

इराण, इराक आणि अमेरिकेतील तणावामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम विदर्भातील शेतमालाच्या दरांवर होत असून, यवतमाळ जिल्ह्यात गव्हाला प्रतिक्विंटल केवळ १८०० ते २२०० रुपये दर मिळत आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेला सुमारे २३२५ रुपयांचा हमीभावही अनेक ठिकाणी मिळत नसल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत.

जिल्ह्यात यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, घाटंजी, राळेगाव, वणी, झरी-जामणी, पुसद, उमरखेड, महागाव, नेर व केळापूर या तालुक्यांत रब्बी हंगामात गहू पिकाचे उत्पादन घेतले जाते.

मात्र यंदा खरीप हंगामातील अतिवृष्टी व गारपिटीमुळे कापूस व सोयाबीनचे नुकसान झाले होते. त्यानंतर आता गव्हालाही कमी दर मिळत असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. दरम्यान, शेतकरी चळवळ यवतमाळच्या वतीने आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात आले. शेतमालाला योग्य भाव देणे, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि नुकसानभरपाई देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सध्याच्या परिस्थितीत उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्न घटल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी होत आहे.

# पाणीपुरवठा योजनांवर वीज खंडितीची टांगती तलवार

प्रतिनिधी २३ मार्च

**यवतमाळ :** जिल्ह्यातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांकडे मोठ्या प्रमाणात वीज बिल थकबाकी राहिल्याने वीजपुरवठा खंडितीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महावितरणने थकबाकी वसुलीसाठी कठोर भूमिका घेतली असून, संबंधित विभागांनी तातडीने बिल भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील एकूण १,९५७ सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांकडे तब्बल ५८ कोटी ८५ लाख रुपयांची थकबाकी आहे. वारंवार पत्रव्यवहार, स्मरणपत्रे व प्रत्यक्ष पाठपुरावा करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई अपरिहार्य ठरत असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

दरम्यान, थकबाकी वसुलीसाठी महावितरणने क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक निर्देश दिले असून, कारवाईला सुरुवातही करण्यात आली आहे. याअंतर्गत काही योजनांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याची माहिती आहे.

आर्थिक वर्ष समाप्तीला अवघे काही दिवस शिल्लक असल्याने वसुली मोहिमेला गती देण्यात आली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास जिल्ह्यात पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागांनी तातडीने थकबाकी भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीस संबंधित विभाग जबाबदार राहतील, असा इशाराही महावितरणकडून देण्यात आला आहे.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस ; नऊ जण जखमी

प्रतिनिधी २३ मार्च

**यवतमाळ :** शहरातील माईंदे चौक परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने दहशत माजवत नऊ नागरिकांना चावा घेतल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषदेच्या निष्क्रियतेविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

महिला बँकेमागील अपार्टमेंट परिसरात ही घटना घडली. जखमी नागरिकांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या भागात आधीपासूनच भटक्या कुत्र्यांचा मोठा वावर असून, पिसाळलेल्या कुत्र्यामुळे



परिस्थिती गंभीर बनली आहे.

घटनेनंतर शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष संजय उपगनलावार यांनी घटनास्थळी भेट देऊन नागरिकांशी चर्चा केली. त्यांनी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधला असता, "कुत्रे पकडण्याचा परवाना नसल्याने कारवाई शक्य नाही," असे उत्तर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. माईंदे चौक, संकट मोचन रोड, समर्थवाडी, शिवाजीनगर, गिलानी नगर, दहिवलकर प्लॉट या भागांत कुत्र्यांचा त्रास वाढला असून, वाहनचालकांवर धावून जाण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. अपघातांत अनेकजण जखमी झाले आहेत.

दरम्यान, नागरिकांनी स्वरक्षणासाठी काठ्या व दगड घेऊन घराबाहेर पडण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संजय उपगनलावार यांनी दिला आहे.

# 'समता महोत्सवा'तून सामाजिक एकतेचा संदेश

प्रतिनिधी २३ मार्च

**यवतमाळ :** महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९ व्या वर्षानिमित्त २० व २१ मार्च रोजी आयोजित दोन दिवसीय 'समता महोत्सव' शहरातील शिवतीर्थ येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला हजारो नागरिकांची उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. लीला भेले होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सत्याग्रही डॉ. प्रमिला संपत यांचा सत्कार करण्यात आला. मंचावर मंगला मून (सहायक संचालक, सामाजिक न्याय विभाग), प्रकाश नगराळे (सहाय्यक आयुक्त, बहुजन कल्याण विभाग), समतापर्व प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थूल, डॉ. सुमेध देवतळे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, राजू चांदेकर, उमेश मेश्राम, प्रमोदिनी रामटेके, डॉ. विलास किनाके तसेच रॅप गायक बिपिन तातड उपस्थित होते.

प्रा. प्रवीण देशमुख यांनी ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडत सामाजिक एकतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. प्रमिला संपत यांनी आंबेडकरी चळवळीतील कृतिशीलतेवर भर दिला.

कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरणांना विशेष प्रतिसाद मिळाला. बिपिन तातड यांच्या सादरीकरणाने तरुणाईत उत्साह निर्माण झाला. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. चंद्रकांत सरदार यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या इतिहास परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

समारोप कार्यक्रमास आमदार बाळासाहेब मांगुळकर उपस्थित होते. तसेच मंचावर माधुरी वाळके, डॉ. नीरज वाघमारे, मीराताई वीर, विपुल खोब्रागडे यांची उपस्थिती होती.

यशस्विनी योगा ग्रुपच्या वतीने लेझीम सादर करण्यात आले. वैशाली सोसायटी (उमरसरा), पाठपुरा, पिपळगाव येथील महिलांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितेश मेश्राम यांनी केले, तर आभार प्रदर्शन काजल तायडे यांनी मानले. समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

# शिलाई मशीन व ब्युटी किट वाटप

प्रतिनिधी २३ मार्च

**महागाव :** महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी जनसेवा फाउंडेशन व सक्षम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त शिलाई मशीन व ब्युटी पार्लर किट वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात आयोजित कार्यक्रमास महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष सुनंदा दिलीपराव कोपरकर होत्या. तहसीलदार अभय मस्के यांच्या हस्ते उद्घाटन झाले. नगराध्यक्ष रंजना दीपक आडे, ज्येष्ठ नेते संभाजीराव नरवाडे, उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे, उमरखेड येथील समाजसेविका सरोज देशमुख, सविता चंद्रे, केवटे, नगरसेविका जयश्री संजय नरवाडे, नगरसेवक तथा काँग्रेस शहराध्यक्ष शैलेश कोपरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल नरवाडे, माजी नगरसेविका आशाताई सुनील भरवाडे, समाजसेविका शीलाताई सुरेश भरवाडे, खरेदी-विक्री संघाच्या संचालिका सीमाताई नितीन नरवाडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश भोयर, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय कोपरकर, सुभाषराव शिंदे, ज्येष्ठ पत्रकार गजानन वाघमारे, संजय भगत, नगरसेविका सुरेखा विनोद कोपरकर, करूना शिरबिरे, जान्हवी सुरोशे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात संजय भगत यांनी महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. जनार्दन सुरोशे यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सूत्रसंचालन कोमल पाटील सोनटक्के यांनी केले.

अक्षदा ब्युटी पार्लरच्या संचालिका पूनम विजय भरवाडे यांच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास शहरातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी प्रिती नरवाडे, ज्योशना नेवरे, शितल नरवाडे, शिल्पा कावळे, कीर्ती पाटे, आरती नेवारे, वैशाली गावंडे, दुर्गा कुसंगवर, अश्विनी नरवाडे, ऋतुजा पवार, प्राजक्ता नरवाडे यांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. तसेच प्रियंका लोंढे, रिंकू बहादूरे, सुषमा चावतमळ, रुपाली कदम, वर्षा राठोड, वैष्णवी जाधव, नंदिनी कदम, कल्याणी कदम यांना ब्युटी पार्लर किट देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबाराव ठाकरे, अशोकराव कदम, नंदाताई रमेश कदम, सुजाता कोपरकर, मेघा नरवाडे, वैष्णवी कदम, संगीता कदम, संगीता भरवाडे, विजय भरवाडे, प्रविण चिलकर यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# उमरखेड पोलिसात राऊंड कंट्रोल व्हॅनसह तीन नवीन बोलेरो दाखल

प्रतिनिधी २३ मार्च

**उमरखेड :** शहर व परिसरातील कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने उमरखेड पोलीस ठाण्याच्या ताफ्यात राऊंड कंट्रोल व्हॅनसह तीन नवीन बोलेरो वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार ही वाहने उपलब्ध करून देण्यात आली.

आमदार किशनराव वानखेडे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या उपस्थितीत या वाहनांचे उद्घाटन करण्यात आले. नव्या राऊंड कंट्रोल व्हॅनमध्ये अत्याधुनिक सुविधा असून, चारही बाजूंनी उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे पोलीस नियंत्रण कक्षाशी थेट संपर्क ठेवून परिसरावर सतत नजर ठेवणे शक्य होणार आहे. याशिवाय, वाहनात फोकस




कॅमेरे, मेमरी सिस्टीम व वायरलेस संच उपलब्ध असल्याने घटनास्थळी त्वरित माहिती मिळवणे व समन्वय साधणे अधिक सुलभ होणार आहे. नवीन बोलेरो वाहनांमुळे शहरासह ग्रामीण भागात पोलीस पेट्रोलिंग अधिक प्रभावीपणे करता येणार असून, कोणत्याही घटनेवर तात्काळ प्रतिसाद देणे शक्य होईल.

डायल ११२ सेवेंतर्गत येणाऱ्या तक्रारींवर जलद कारवाई करण्यासही या वाहनांची मदत होणार आहे. चोरी, घरफोडी, वाहन चोरी यांसारख्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित पेट्रोलिंग वाढविण्यात येणार आहे. तसेच सण-उत्सव, निवडणुका व सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठीही या वाहनांचा उपयोग होईल.


नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील अपघातप्रवण भाग तसेच पैनगंगा नदी परिसरात आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत व बचावकार्य करण्यासाठीही ही वाहने उपयुक्त ठरणार आहेत. या नव्या वाहनांमुळे उमरखेड पोलीसांची कार्यक्षमता वाढून नागरिकांना अधिक सुरक्षित व तत्पर सेवा मिळणार आहे.

# कर्करोगग्रस्त ताजणे कुटुंबाला ३ लाखांची मदत

प्रतिनिधी २३ मार्च

**यवतमाळ :** महागाव कसबा (ता. दारव्हा) येथील कर्करोगग्रस्त किशोर शिवाजीराव ताजणे (६१) यांच्या उपचारासाठी खासदार संजयभाऊ देशमुख यांच्या पुढाकारातून पंतप्रधान सहाय्यता निधीतून ३ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली.

ताजणे यांना जिभेचा कर्करोग झाल्याचे निदान झाल्यानंतर नागपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले. डॉक्टरांनी केमोथेरपी व इम्युनोथेरपी उपचारासाठी सुमारे १२ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने कुटुंबीयांपुढे मोठे संकट उभे राहिले होते.





दरम्यान, खासदार देशमुख कॅन्सरग्रस्तांना मदत करतात, अशी माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचे स्वीय सहाय्यक गजानन कदम यांच्याशी संपर्क साधला. दिग्रस येथे झालेल्या भेटीत परिस्थितीची माहिती दिल्यानंतर देशमुख यांनी तातडीने पंतप्रधान सहाय्यता निधीकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

गजानन कदम यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्तावाचा पाठपुरावा केला. त्यानंतर ताजणे यांच्या उपचारासाठी ३ लाख रुपयांची मदत मंजूर झाली. या मदतीमुळे ताजणे कुटुंबाला दिलासा मिळाला असून, त्यांनी खासदार देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. २३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## संघटन मध्ये मोठी ताकद - मुनीश्री विनतसागरजी महाराज



**वाशीम :** एका हाताने टाळी वाजत नाही त्याकरिता दोन हाताची गरज असते. जर आपण एखादे गोटे कुत्रा मांजर किंवा अन्य प्राण्यांवर मारण्याकरिता सांगितले तर व्यक्ती ते कार्य करू शकेल मात्र तोच गोटा मधुमक्खी बसलेल्या छतावर मारण्यासाठी सांगितले तर तो हे कार्य करणार नाही मधुमक्खी जरी आकाराने लहान असली तरी त्यांच्यातील संघटन शक्तीमुळे कुणीही गोटा मारण्याची हिंमत करत नाही त्याचप्रमाणे समाजामध्ये परिवारामध्ये संघटन जरुरी आहे संघटन मध्येच मोठी ताकत असल्याचे प्रतिपादन मुनिश्री विनतसागर महाराज यांनी केले. स्थानिक श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन सैतवाळ संस्थान अतिशय क्षेत्र येथील सभागृहात अध्यात्मिक पूजन शिबिरामध्ये भक्तांना मार्गदर्शन करताना शुक्रवार दिनांक २० मार्च रोजी त्यांनी वरील प्रतिपादन केले. यावेळी मंचावर मुनिश्री विश्वदृगसागर महाराज उपस्थित होते. सर्वप्रथम भक्तांच्या वतीने दीपप्रजलवन, पादपक्षालान, व शास्त्र भेट करण्यात आली यावेळी मुनीश्री विणतसागर महाराज यांनी पुढे सांगितले.

# दहा हजार द्या, घरकुल अनुदान घ्या !

## *घरकुल लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक *भ्रष्टाचारात रिसोड तालुका अव्वलस्थानी

● वसंत खडसे @ वाशीम ●

गोरगरिबांना हक्काचा निवारा मिळावा त्यांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे, तसेच ग्रामीण भागातील कच्चा घराच्या जागेवर पक्के घर बांधले जावे आणि शहरी भागातील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन व्हावे यासाठी केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली आहे. पक्के घर नसलेल्या प्रत्येक कुटुंबाला स्वतःचे घर उपलब्ध करून देणे व त्या घरामध्ये वीज, पाणी आणि स्वच्छतेची सुविधा सुनिश्चित करणे आदी या योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत. गोरगरिबांच्या कल्याणासाठी शासन हजारो कोटी रुपयांचा निधी खर्ची घालत आहे. परंतु प्रशासनातील भ्रष्टाचारी अधिकारी आणि कर्मचारी व गावपातळीवरील सरपंच, सचिव आणि त्यांच्या सानिध्यात कार्यरत असलेल्या दलालांनी घरकुल योजना म्हणजे, दूध देणारी ' कोकणी म्हैस ' समजून दहा हजार द्या, अन् घरकुल अनुदान घ्या..! हा स्वयंघोषित नियमच घालून दिला असल्याचे बोलले जात आहे. परिणामी गोरगरीब लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे वास्तव समोर येत असून या भ्रष्टाचारात रिसोड तालुका अव्वलस्थानी असल्याची माहिती हाती आली आहे.






सदर घरकुल योजनेचा पहिला हप्ता लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होताच, स्थानिक पातळीवरील सरपंच, सचिव आणि ज्यांना घरकुलाचा कोठा वाटून देण्यात आला असे उपसरपंच व काही सदस्य यांचे कमिशन पहिले वर्ग करून द्यावे लागत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. तसं पहिलं तर प्रधानमंत्री आवास योजना म्हणजे गोरगरिबांचे घराचे स्वप्न पूर्ण करणारी केंद्र व राज्य सरकारची स्तुत्य योजना आहे. गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना स्वतःच्या हक्काची घरे उपलब्ध करून देणे हा या योजनेचा गाभा आहे. या योजनेद्वारे शहरी आणि ग्रामीण भागातील बेघर कुटुंबे तसेच कच्चा व मोडकळीस आलेल्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना सुरक्षित आणि मूलभूत सुविधांनी युक्त घरे पुरवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. त्यासाठी शासन हजारो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत आहे. मात्र ग्राम पंचायतीच्या सरपंच, सचिवांपासून ते थेट गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत खाबुगिरी मोठ्या प्रमाणात फोफावल्यामुळे या योजनेच्या मुख्य उद्देशालाच ' खो ' दिला जात आहे. त्यामुळे अनेक पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लाभार्थ्यांना घरकुल अनुदान वितरीत करण्यात आले असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. यात रिसोड तालुक्यातील जवळपास प्रत्येक गावात शेकडो बोगस लाभार्थ्यांना घरकुल योजनेच्या अनुदानाचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात कोणतेही बांधकाम न करता दुसऱ्यांचे बांधकाम दाखवून हप्ते उचलण्यात आली असून आजमितीस सुद्धा हा गोरख धंदा जोमात सुरू असून सबंधित अधिकाऱ्यांना दाम देऊन काम करून घेतले जात आहे. अशी माहिती पुराव्यानिशी सिटीन्यूज सुपरफास्टच्या हाती आली आहे. शिवाय ज्या लाभार्थ्यांनी संबंधित सरपंच, सचिव आणि त्यांच्या वरिष्ठांना लाच देण्यास नकार दिला अशा लाभार्थ्यांच्या अनुदान हप्त्याचा वाटप जाणीवपूर्वक अडकवून ठेवला जातो व जे लाभार्थी दलालांमार्फत पैसे देतात त्यांचे अनुदानाचे हप्ते वेळेवर दिले जातात अशी खळबळजनक माहिती सूत्रांनी दिली आहे.

### भ्रष्टाचार रोखण्याचे जिल्हा प्रशासनापुढे आवाहन

घरकुल योजनेच्या भ्रष्टाचाराची सुई प्रामुख्याने सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ऑपरेटर पासून ते थेट गृहनिर्माण अभियंता व गटविकास अधिकाऱ्यांपर्यंत झुकते. आता यात जिल्हा प्रशासनातील देखील आणखी कोणी आहे का हे पाहणे देखील खुप महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच या अनियमिततांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील वरिष्ठ प्रशासनाने प्रशासकीय वचक निर्माण करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील बोगस लाभार्थ्यांची कसून तपासणी करून दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई होणे अपेक्षित आहे. शिवाय सामाजिक लेखापरीक्षण करून, तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करणे जेणेकरून तक्रारदारांच्या तक्रारींची तातडीने दखल घेतल्या जाईल. परिणामी दोषी आढळून आलेल्यांवर कठोर कारवाई होईल आणि खऱ्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळेल. मात्र याआधी झालेला व सद्यस्थितीत सुरू असलेला भ्रष्टाचार पाहता या घोटाळ्याची पाळंमुळ खुप खोलवर रुजली असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे या योजनेतील भ्रष्टाचार रोखणे हे जिल्हा प्रशासनापुढे एक आवाहन असेल असे म्हटले जात आहे.

## थोडक्यात

### स्व.विद्याबाई भारस्कर यांचे प्रथम पुण्यस्मरण दिन

#### विविध सामाजिक कार्यक्रम संपन्न



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

नाथ नगरीतील सामाजिक कार्यकर्ते तथा नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रक्तदाता सामाजिक बहूउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश भारस्कर यांच्या मातोश्री स्व.विद्याबाई वसंतराव भारस्कर यांचे प्रथम स्मृतिदिनानिमीत्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामधे चित्रऋषी महाराज वृध्दाश्रम, वरुड येथील वृध्दांना भोजन तथा शालवाटप करण्यात आले तसेच मुकबधीर निवासी विद्यालय, तुळजापूर येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देवून पाणीबॉटलचे वाटप करण्यात आले.पिंजर येथील संत गाडगेबाबा आपातकालीन शोध व बचाव पथक यांना जिवरक्षण व रुग्नसेवा देताना उपयोगी पडणारे ९००० रुपये किमतीचे सक्शन मशिन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिवरक्षक मा.श्री. दिपकभाऊ सदाफळे यांचेकडे दानस्वरूपात भेट देण्यात आले आहे. त्यासोबतच संत बिरबलनाथ महाराज भजनी मंडळ, मंगरुळनाथ यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच श्री.चारभूजानाथ संस्थान, मंगरुळनाथ येथे आरतीचे आयोजन करुन प्रसाद वाटप करण्यात आला.यावेळी राजेश भारस्कर यांचेसह शशांक हेमके, संजय बोबडे, निलेश घुगे, शिवा भडागे, अन्सार शेख, अतुल उमाळे, विजेन्द्र गुप्ता, रविआवटे, मोरेश्वर शामसुंदर, उषा भारस्कर, नुतन बोबडे, श्रावणी बोबडे, संयमी हेमके, गौरी व लक्ष्मी भारस्कर यांचेसह मित्रपरीवार उपस्थित होता.

### विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी अध्यक्षांचा मेळावा



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

अकोला - वाशिम जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाची निवडणूक जाहिर झाली असून. यामुळे सहकार क्षेत्रातील वातावरण तापणार आहे. मात्र गत निवडणुकीप्रमाणे ही निवडणूक रंगतदार होणार की नेहमीप्रमाणे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. २९ मार्च रोजी मतदान होणार असून ३० मार्च रोजी निकाल जाहीर होणार आहे.

अकोला वाशिम जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात आहे. ही बँक आर्थिक दृष्ट्या प्रगतीपथावर असून कर्ज वितरण व अन्य वित्तीय सेवांमध्ये अग्रेसर आहे म्हणूनच अनेक वर्षांपासून या बँकेवर सहकार पॅनलची सत्ता आहे. या जिल्हा बँकेची निवडणूक सहकार विभागाकडून जाहीर झाली असून १० ठिकाणी संचालक मंडळ अविरोध निवडून आले आहे तर इतर ११ ठिकाणी येत्या २९ मार्चला निवडणूक होणार असून ३० मार्चला मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर मंगरूळपीर येथील सांस्कृतिक भवनात ता. २२ रोजी तालुक्यातील विविध सहकारी सोसायटीच्या अध्यक्षांचा मेळावा आयोजित केला होता.

## मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी साहेब मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत असून बंदोबस्त करण्याची केली आहे.

मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने, रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, कारंजा रोड, आंबेडकर चौक, बसस्थानक चौक व मानोरा रोड व ,पोस्ट ऑफिस रोड इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे तसेच या तील अनेक भागात मोकाट गुरांनी ठिय्या मांडलेला असतो त्यामुळे रहदारिस मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे.त्यामुळे शहरातील मोकाट गुरांचा बंदोबस्त करणे अतिशय आवश्यक आहे. तरी





मुख्याधिकारी साहेब यांना विनंती की, त्यांनी पालिका प्रशासन मार्फत आवश्यक कार्यवाही व व्यवस्था करून शहरातील मोकाट गुरांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

### राजस्थानी महिलांच्या वतीने चैत्र द्वितीया सिंजारा उत्सव साजरा

**वाशीम :** शहरात राजस्थानी समाजाच्या सौभाग्यवती महिला आपल्या घर परिवाराच्या सुख शांती समृद्धी तसेच कुमारी कन्या चांगला वर मिळावा म्हणून गणगौर उत्सव मोठ्या श्रद्धेने भक्ती भावाने पूर्ण करतात, ठीक ठिकाणी गणगौर उत्सवाची सुरुवात होळी नंतर होत असून सिंगारा उत्सव हा चैत्र तृतीया च्या दिवशी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो . शुक्रवार २० मार्च रोजी लाखाळा येथील सोमानी फार्म हाऊस वर राजस्थानी महिलांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सिंजारा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मोठ्या प्रमाणाने साजरा करतात. स्थानिक सोमानी फार्म हाऊस वर सिंजारा उत्सवाच्या यशस्वीते करिता सौ कौशल्या विजय सोमानी, सो शितल शैलेश सोमानी, सो. अमृता सोमानी, सो .सुनीता सोमानी व सोमानी परिवाराने परिश्रम घेतले सोमानी परिवाराच्या वतीने सर्व महिलांकरिता अल्पोपराची व्यवस्था करण्यात आली होती.

## उन्हाची तीव्रता वाढल्याने रस्त्यावर शुकशुकाट







● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून उन्हाची तीव्रता वाढल्याने दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. सद्यस्थितीत उन्हाचा पार ४० अंशावर गेला असल्याने आगामी काळात उन्हाच्या झळा वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत आहे. उन्हाची तीव्रता अचानक वाढल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागत असून कुलरचा वापर वाढला आहे.

उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच कडाक्याचे ऊन जाणवत असल्याने त्याचा परिणाम वाहतूक, बाजारपेठ तसेच दैनंदिन कामकाजावर होत असल्याने जनजीवन प्रभावित झाले आहे. दुपारी बारानंतर उन्हाचे चटके जाणवत असल्याने कामानिमित्ताने घराबाहेर पडणारे नागरिक उन्हापासून सुरक्षिततेची काळजी घेवून बाहेर पडत आहेत. वाढत्या उन्हाचा परिणाम वाहतूक वर्दळीसह हातगाडीधारक विविध वस्तू विक्रेते तसेच फेरीवाले यांच्या व्यवसायावर देखील झाला आहे. दुपारच्या वेळी उन्हाचे चटके सहन करावे लागत असल्यामुळे मुख्य रस्त्यावरची वाहतूक विरळ झाल्याचे चित्र दिसून येते आहे. दरदविशी देवदर्शनासाठी भाविकांच्या गर्दीमुळे भरगच्च होणारी मंदिरे उन्हामुळे दुपारच्या वेळी ओस दिसून येत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच नागरिकांना उन्हाची तीव्रता सहन करावा लागत असून जिवाची लाहीलाही होत असल्याचे चित्र आहे.मागील आठवड्यापासून उन्हाच्या तिव्रतेत काही प्रमाणात वाढ झाली. पुढील आठवड्यात उन्हाच्या पारा ४२ ते ४३ अंशावर जाण्याची शक्यता आहे.त्यामुळे नागरीकांनी अत्यावश्यक कामासाठीच दुपारच्या वेळी घराबारहेर पडावे. अशावेळी उन्हापासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी. उष्माघाताची शक्यता वाटत असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उन्हाची तिव्रता पाहता नागरीकांनी आरोग्य जपण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

- बाळासाहे बोराडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, वाशीम

उन्हाची तीव्रता वाढल्याने थंडगार लस्सी, ताक , मठ्ठा, शीतपेय बर्फ गोळा या वस्तूंना मागणी वाढली आहे.दुपारच्या वेळी गावखेड्यासह शहरातील गल्लीबोळात ऊसाचा रस, आईस्क्रीम, बर्फ गोळे विक्रेते फिरताना दिसून येत आहेत.

### संतुलीत आहार ठेवा

उन्हाळा येऊन दाखल झाला आहे. तापमानातही परिवर्तन व्हायला सुरुवात झाली आहे. तप्त दुपार आणि गरम हवा शरीरावरही परिणाम करतेच. त्यामुळे उन्हाळा आल्यानंतर तुमच्या जेवणाच्या दिनचर्येतही बदल गरजेचा आहे.उन्हाळ्यात अधिक तेलकट खाणे नुकसानदायक ठरू शकते. त्यामुळे संतुलित आहाराची आवश्यकता असते. दिवसाची सुरुवात एक लीटर पाणी किंवा लिंबू पाण्याने करा. दिवसभर जास्तीत जास्त पाणी पिणेही आवश्यक असते.

## वाशीम येथील फुले मार्केट नव्हे 'फेल मार्केट'!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नगरपरिषदेच्या वतीने शहरातील मोक्याच्या जागी बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या महात्मा फुले संकुलाची आजघडीला दुरावस्था झाली असून या संकुलाची स्वच्छता व देखरेखीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकासकाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील दुकानदारांच्या व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे.

येथील दुकानदारांकडून कर व भाडे न.प.ला भरणापोटी काही रक्कम या संकुलाच्या देखरेखीसाठी नियुक्त



केलेल्या विकासकाला मिळत असते हे येथे उल्लेखनिय. माहितीच्या अधिकारान्वये या संकुलाबाबतच्या महत्वपुर्ण कागदपत्रांची मागणी केली असता ही कागदपत्रे अमरावती येथील विभागीय कार्यालयात जमा असल्याचे सांगण्यात आले.याबाबत अधिक वृत्त असे की, लघु व्यवसायीकांच्या व्यवसायासाठी येथील रविवार बाजारात नगर परिषदेच्या वतीने महात्मा फुले संकुल उभारण्यात आले आहे. व्यापारीक दृष्टीकोनातून उभारण्यात आलेले हे संकुल न.प.पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या ठिसूळ नियोजनामुळे पुर्णत: 'फेल मार्केट' म्हणून कुप्रसिध्द झाले आहे. सगळीकडे घाण, दुर्गंधी, अस्वच्छता या चक्रात सापडलेल्या या संकुलाचा वापर आजघडीला गदुल्ले, नशेबाज, पत्तेबाज, अवैध दारुविक्री, अवैध वरली मटक्यासाठी उपयोगात येत आहे. त्यामुळे या डोकेदुखीला संकुलातील लघुव्यवसायीकांना सामोरे जावे लागत आहे.

## प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'

### मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल



● सिटी न्युज ब्युरो @ मानोरा ●

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा ह्या तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची



गरज आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण झाडेच नामशेष होण्याची भीती निसर्ग प्रेमी कडून होत आहे काही जागरूक नागरिकांनी भ्रमणध्वनी वरून अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली किंवा शोशल मीडियाच्या माध्यमातून फोटो व माहिती पुरविली तर ती माहिती वनतस्कर ला पुरविली जाते व त्याला सावध करतात यावरून वृक्ष कटाई बाबत हे अधिकारी कर्मचारी किती जागरूक आहे हे समजून येते.

# जगण्याची कळ, महागाईची झळ !

## बांधकाम साहित्यासह जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ, हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे.

घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २३ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्ह्यात १३ थेट सरपंच व १२६ सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक

**अकोला :** राजीनामा, निधन, अनर्हता आदी कारणांमुळे रिक्त झालेल्या ग्रा. पं. सदस्य, थेट सरपंच पदांच्या निवडणुकांसाठी कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने घोषित केला आहे.

त्यात अकोला जिल्ह्यातील ७६ ग्रामपंचायतीतील १३ थेट सरपंच पदे व १२६ रिक्त सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. या अनुषंगाने आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन व्हावे व निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सर्व यंत्रणांना दिले आहेत. कार्यक्रमानुसार, तहसीलदारांनी निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करण्याची तारीख ३० मार्च आहे. नामनिर्देशनपत्रे ७ ते १३ एप्रिल या काळात (शनिवार व रविवार वगळून) स. ११ ते दु. ३ या वेळेत सादर करता येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी दि. १५ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. पासून होईल.

# शहरातील सगळ्यांना स्वत :चे घर मिळाले पाहिजे ही आमची भावना – विजय अग्रवाल

### ◆सोमवारच्या सर्वसाधारण सभेत काही मुद्दांवर सत्ताधारी व विरोधकात जोरदार खडाजंगी

प्रतिनिधी २३ मार्च

**अकोला :** पंतप्रधान आवास योजना २.० ला यशस्वीरित्या अमलात आणण्यासाठी शहरातील शासकीय व महापालिकेच्या जागेवरील भूखंडाचे जागावाटप करण्यासाठी अभिकर्ता निवडणे, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २०२१ अंतर्गत गुंठेवारी नियमानुकूल प्रकरणांची कालावधी वाढविण्यावर चर्चा करणे वर्ष २०२५ २६ या आर्थिक वर्षासाठी पुनर्विनियोजन अंतर्गत स्वर्ण जयंती नगरोत्थान महाअभीयान, नागरी दलितेतर वस्ती सुधार कार्यक्रम, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना व अन्य नवीन योजनांसाठी विकास कामांच्या प्रस्तावावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेत सर्वात आधी मतदार यादी शुद्धीकरण अभियान अर्थात एसएआर अंतर्गत नवीन नियमांना घेऊन प्रशासनासोबत नगरसेवकांनी चर्चा केली मागील





निवडणुकीत मतदार यादी चा मोठा घोळ निर्माण झाला होता त्यासाठी बीएलओ जबाबदार असल्याचा आरोप सर्वच नगरसेवकांनी केला त्यावर बोलताना आपल्या सर्वांच्या सूचनांचा आदर केला जाईल असे आश्वासन देण्यात आले शहीद दिनानिमित्त शहिदांना श्रद्धांजली देण्यात आल्यावर सभेस सुरुवात झाली. महानगरपालिका पंतप्रधान आवास योजना दोन अंतर्गत शासनाच्या तसेच महापालिकेच्या जागांचे वाटप करून लाभार्थ्यांना तीस वर्षासाठी भाडेपट्टा उपलब्ध करून देण्यासाठी अभिकर्ता निवड या विषयावर सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांमध्ये चांगलीच खडा जंगी पाहावयास मिळाली या मुद्द्यावर जोरदार चर्चा झाली आरोप प्रत्यारोप सुद्धा झाले,

यावर बोलताना सुनील मेश्राम यांनी जसे रेल्वेच्या जागा नदीकाठच्या जागा या जागा कायद्यात बसतात की नाही यावर स्पष्ट सांगा तसेच कर्मचारी आयुक्तांची दिशाभूल करीत आहेत असा आरोप केल्यावर आयुक्तांनी त्यांचा आरोप खोडून काढला सर्वे केल्यानंतरच सर्व २२ स्पष्ट होतील सर्वे झाल्यानंतर ठरेल कोण पात्र व कोण अपात्र असे स्पष्ट करीत आयुक्तांनी कर्मचारी माझ्याशी नेहमी चर्चा करतात माझी दिशाभूल करीत नाहीत असे म्हणत कर्मचाऱ्यांची पाठराखण केली. २०१६ मध्ये एका कंपनीने सर्वे च्या नावाखाली लोकांना आर्थिक चुना लावला होता असा आरोप मोहम्मद फजलू पैलवान यांनी लावला असता त्यावर विजय अग्रवाल यांनी त्यांना आपल्याला विषय कळत नसेल तर त्यावर बोलू नये अशा शब्दात फटकारले. शहरात ८१ झोपडपट्टी आहेत परंतु हद्द वाढ झाल्यानंतर आणखी काही झोपडपट्ट्या त्यात येऊ शकतात त्यासाठी आधी सर्वे होऊ द्या शहरातील एकही झोपडपट्टी धारक स्वतःच्या जागेपासून आणि घरापासून वंचित राहू नये अशी आमची भूमिका आहे. पंतप्रधान आवास योजनेसाठी राज्यात ३४ लाख घरे मंजूर झाली आहेत त्यातील पाच ते दहा हजार घरे शहरासाठी मंजूर व्हावी अशी आमची इच्छा आहे त्यासाठी पाठपुरावा केला जाईल तसेच शहरातील एकही झोपडपट्टी धारक घरापासून वंचित राहू नये यासाठी काटेकोर अंमलबजावणी केली जाईल त्यासाठी पाच जणांची समिती नेमली जाईल त्यामध्ये विरोधी पक्ष नेत्याचा सुद्धा समावेश असेल असे आश्वासन विजय अग्रवाल यांनी दिले सरते शेवटी या विषयास मंजुरी देण्यात आली बातमी लिहिस्तोवर सभागृहात अन्य विषयावर चर्चा सुरू होती.

## बोर्डी येथे अज्ञाताने लावलेल्या आगीत ठिबक नळ्या जळून खाक



प्रतिनिधी २३ मार्च

**अकोट :** अकोट तालुक्यामधील सातपुड्यात वसलेले बोर्डी शिवारातील शेतात अज्ञाताने लावलेल्या आगीत ठिंबक नळ्यासह शेतातील आंबा, वड, सागवान आदी झाडालाही आगीची आस लागून नुकसान झाले आहे.

बोर्डी येथील शेतकरी चंद्रकिशोर जयस्वाल यांच्या गट नं.२३० मधील शेतात १६ मार्च दुपारी अंदाजे १ ते २ वाजेदरम्यान अज्ञाताने नुकसान करण्याचे हेतूने आग लावली. ही बाब निदर्शनास येताच शेतकरी जयस्वाल हे शेतात गेले असता ठिंबक नळ्या खाक झाल्या व झाडांचे फांद्या जळाल्याचे लक्षात येताच त्यांनी पो.स्टे.अकोट ग्रामीणला तक्रार नोंदवली. तसेच महसूल विभागाला देखील कळविले. त्यानुसार दुसरे दिवशी ग्राम महसूल अधिकारी पवार व कोतवाल गावंडे यांनी शेतात जाऊन पंचा समक्ष नुकसानीचा पंचनामा केला. त्यानुसार शेतात असलेल्या ठिंबक नळ्यांचे २७ बंडल जळून खाक झाले. त्यांची अंदाजे किंमत ४५ हजार रु. आहे. तसेच शेतातील आंबा, वड व सागवानचे झाडालाही आगीने घेरल्याने फांद्या जळाल्या आहेत. तसेच दुसरे दिवशी पो.स्टे.चे अंमलदार यांनी सुद्धा शेतात जाऊन मोका पाहणी करत पंचनामा केला. माझे शेतात अज्ञाताने गव्हाचे नुकसान करण्याच्या हेतूने आग लावली, सुदैवाने गहू जळाला नाही. मात्र ठिंबक नळ्याचे २७ बंडल जळून खाक झाल्याने अंदाजे ४५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. तरी अज्ञाताला शोधून काढत कार्यवाही करावी. मला नुकसान भरपाई मिळावी.

## सुवर्णकार शैलेश खरोटे अकोला सराफा असोसिएशनच्या शहराध्यक्षपदी बिनविरोध

प्रतिनिधी २३ मार्च



**अकोला :** सराफा व्यापा-यांच्या समस्या सोडविण्यासाठी पाच वर्षात केलेल्या कार्याचा विचार करून अकोला सराफा असोसिएशनच्या बैठकीत अध्यक्षपदाच्या निवडणुकीत एस. एस. खरोटे सुवर्णकारचे संचालक शैलेश खरोटे यांची अविरोध निवड करण्यात आली. शहराध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा त्यांच्यावर सोपविण्यात आली. असोसिएशनचे वरिष्ठ पदाधिकारी व सराफा व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या बैठकीला ज्येष्ठ सराफा व्यवसायी गोपालबाबू खंडेलवाल, सुनील जांगिड, राजकुमार वर्मा, संतोष खंडेलवाल, नितीन खंडेलवाल, प्रकाश सराफ, नंदू अलिमचंदानी, राहुल भगत, विजय खरोटे, विनोद माथने, अश्विन दंडगव्हाळ, सचिन भामरे, मोहन वाकोडे, विशाल चौधरी, राजेंद्र आडगावकर, सुनील वर्मा, संजय वर्मा, किरण पिंगळकर, स्वप्निल मोरे, सागर वाखारकर, अनिल वाखारकर, संजय शाह, निहार अग्रवाल, हिरेन वखारिया, मनीष हिवराळे, मधुर खंडेलवाल, अमित शाह, नारायण अडगावकर, ज्ञानेश्वर पाटील, गणेश पाचकवडे, अमोल पाचकवडे, सुनील बुडकले, सुनील अडगावकर, विजय भामरे, विजय सोनी, प्रफुल्ल सोनी, अशोक भंडारी, सिद्धेश कागलीवाल, देवेंद्र दोडके यांच्यासह सराफा व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

### ♦ ॲडव्हान्स होमिओपॅथी ट्रीटमेंट रुग्णांसाठी फायदेशीर

प्रतिनिधी २३ मार्च

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. अ?डव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात.





येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नांव सुवर्णा, मी नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी मला थायरॉईड चा त्रास होता वजन वाढले होते. घश्याला कोरड पडायची, बी. पी. वाढले होते, दम लागायचा, अशक्तपणा जाणवयाचा. आता १ महिन्याच्या उपचारानंतर माझे २ किलो वजन कमी झाले आहे. घश्याला कोरड पडणे कमी झाले आहे. पहिल्यापेक्षा फ्रेश वाटते आहे.कामात मन लागते. शरिरावरील सुज कमी झाली आहे. या १ महिन्याच्या उपचाराने मला ७० टक्के फायदा झाला आहे. नाईक होमिओपॅथीच्या उपचाराने मी पुर्णपणे समाधानी आहे. रूग्णांनी कुठलाही त्रास असल्यास नाईक होमिओपॅथी येवून आजार दुर करावा असे मी सुचवेल.

## वारखेड गावामध्ये वाघाचे दर्शन

### ◆ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण ◆ १५ दिवसांपासून वाघाचा मुक्काम

प्रतिनिधी २३ मार्च





**अकोला :** अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात येणाऱ्या वारी हनुमान या क्षेत्रातील वारखेड या गावात व लगतच्या परिसरात गेल्या पंधरा दिवसापासून वाघाचे वास्तव्य असल्याचे बोलले जात आहे. अशा प्रकारची पुष्टी वन विभागाने सुद्धा केली .अनेक दिवसापासून वाघ तिकडे वास्तव्य करत असल्याने जनतेत भीतीचे वातावरण पसरले आहे. काही जनावरांना वाघाने फस्त केल्याचे समजते. काल वन विभागाच्या अधिकाऱ्याची कर्मचाऱ्यांची या ठिकाणी बैठक झाली. जनतेला सतर्क राहण्याचे आव्हान त्यांनी केले आहे. अंबाबारवा अभयारण्यात हे क्षेत्र येत असल्यामुळे या परिसरात वन्यजीवांचा सहवास पाहायला मिळतो. वाघ, बिबट्या, अस्वल इत्यादी हिंस्र पशु हे गावाच्या लगत फिरताना दिसतात. याकडे वन विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा जीवित हानी कोणी काढता येणार नाही.




## खासगी बस-ऑटोची धडक; महिला ठार

### आसलगाव येथील घटना; पाच जण जखमी

प्रतिनिधी २३ मार्च

**खामगाव :** जळगाव जामोद तालुक्यातील आसलगाव येथे रविवारी सायंकाळी ६:३० वाजताच्या सुमारास खासगी बस-ऑटोचा भीषण अपघात झाला. या अपघातात ऑटोतील एका महिलेचा मृत्यू झाला असून, पाचजण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर संतप्त जमावाने खासगी बसची तोडफोड करत चालकाला मारहाण केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

जळगाव जामोद येथून पुण्याकडे जाणारी खासगी बस क्रमांक (जीजे १४ डब्ल्यू ०५४१) ही आसलगाव येथील नांदुरा रोडवरील धान्य मार्केटसमोर आली असता, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यावेळी समोरून येणाऱ्या ऑटोला क्रमांक (एमएच १९ बीजे २८२५) बसने जोरदार धडक दिली. या अपघातात ऑटोमधील जयश्री किसन उद्धट (३८, रा. आसलगाव) यांचा जागीच मृत्यू झाला.तर ऑटोचालक गजानन सोळंके, गोपाल किसन उद्धट, वंदना अनिल मेहंगे, नंदा प्रकाश डाबेराव व मंगला भीमराव लोथीया हे जखमी आहेत. सर्व जखमींना तातडीने जळगाव जामोद येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी खामगावला पाठवले.घटनास्थळी मोठी गर्दी जमली. यावेळी संतप्त झालेल्या नागरिकांनी खासगी बसवर दगडफेक करत काचा फोडल्या तसेच चालकाला मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अमोल पंडित, भागवत उंबरहंडे व पथकाने घटनास्थळी जात परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी चालकाला जमावाच्या तावडीतून सोडवून ताब्यात घेतले. वृत्त लिहीपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या अपघाताविषयी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## अकोल्यात गॅस सिलिंडर टंचाईने नागरिक हैराण

### ♦ २० दिवसांपूर्वी बुकिंग करूनही सिलिंडर मिळेना



प्रतिनिधी २३ मार्च

**अकोला :** एकीकडे घरगुती गॅस वितरण सुरळीत असल्याचा दावा केला जात असताना, अकोल्यातील समर्थ गॅस एजन्सीच्या कारभारामुळे मात्र नागरिक त्रस्त झाले आहेत. तब्बल २० दिवसांपूर्वी गॅस सिलिंडर बुकिंग करूनही ग्राहकांना अद्याप सिलिंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सिलिंडर मिळत नसल्यामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. वारंवार एजन्सीकडे चौकशी करूनही कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

काही ठिकाणी स्वयंपाकासाठी पर्यायी साधनांचा वापर करावा लागत असून महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे.'वेळेत गॅस सिलिंडर मिळाला नाही, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,' असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK